(3)

**ISSN 0976-0377**
**RNI. MAHMUL02805/2010/33461**

*International Registered and Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor
DR. BALAJI KAMBLE

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 2.06
ISSN 0976-0377
Vol. III , Issue : VII, Jan. 2013 to June 2013


# दलित आदिवासी साहित्य एक आकलन

डॉ. राजेंद्र ठाकरे
मराठी विभाग,
महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर

22 Research Paper -Marathi

दलित आणि आदिवासी यांच्यातील साम्यभेद स्थळाचा शोध घेतला पाहिजे. सांस्कृतिक संदर्भ जेवढा महत्वाचा आहे तेवढाच पर्यावरणीय संदर्भही महत्वाचा वाटतो. दलित आणि आदिवासी यांचा मानसिक पिंड वेगवेगळा दिसून येतो. हे दोन्ही समूह अनार्य वंशाचे असले तरी एक गुलामीत जीवन जगणारा अस्पृश्यांचा समूह म्हणजे दलित आणि गुलामी न स्वीकारता जंगलात संघर्षप्रवण जीवन जगणारा एक समूह म्हणजे आदिवासी होय. या दोन्ही समूहामध्ये फरकआहे. आदिवासी हा दलितांसारखा लढाऊ का झाला नाही ? त्यांच्या साहित्यातील कवितेतील साम्यभेद स्थळाचा शोध घेण्यासाठीच हे विवेचन आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आपल्या अनुभवाची अभिव्यक्ती अत्यंत दमदारपणे दलित साहित्याने व्यक्त केली. दलितांच्या वाटयाला जे जगणे, भोगणे आले त्याला शब्दबध्द करण्याचे काम दलित साहित्याच्या माध्यमातून झालेले दिसते. दलित साहित्य समाज परिवर्तनासाठी, येथील शोषण व्यवस्थेला नष्ट करण्यासाठीच निर्माण झाले आहे. या साहित्याचा उगम चळवळीतून झाला. समाज परिवर्तनाच्या लढयात साहित्य मूलभूत भूमिका वठवू शकते याची जाणीव दलित कवींना, लेखकांना आहे. म्हणूनच शोषण मुक्तीसाठी वेदना, विद्रोह, नकार यातून विधायकतेचा स्वीकारही त्यांनी केला. प्रस्थापितांच्या समग्र विषय व्यवस्थेला नकार देणारे हे साहित्य आक्रमक भूमिका घेऊनच अवतरले. सुरवातीला या साहित्याला विरोध झाला. शेवटी प्रस्थापितांना या साहित्याची दखल घ्यावी लागली. प्रस्थापितांना दलित साहित्याला मान्यता दयावीच लागली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा या मूल्यांचा स्वीकार करणारे हे साहित्य भारतीय साहित्यात आपले स्थान टिकवून आहे. दलित साहित्याचे श्रेष्ठत्व,

व्यापकत्व पाहताना दलित साहित्य म्हणजे काय ? याचा विचार करणे गरजेचे आहे. दलित साहित्याची व्याख्या अनेक अभ्यासकांनी आपल्या पध्दतीने केली आहे.

"दलित म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, बौध्द, कष्टकरी जनता, कामगार, भुमिहिन, शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जाती, आदिवासी" [१]

या नामदेव ढसाळांच्या व्याख्येत व्यापकत्व दिसते. वर्ण व वर्ग व्यवस्थेत जे नाडलेले आहेत, भाडलले आहेत. अशा सर्व शोषितांचा समावेश दलित साहित्यात त्यांनी केला आहे. आदिवासी हाही दलितच आहे असे नामदेव ढसाळांना वाटते. बाबुराव बागुल सांगतात की, "दलित म्हणजे वर्णनव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करु बघणारा. दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने घडू बघणारा. दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत प्रलयकारी केलेले आहेत आणि ज्यांच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि 'शास्त्र' उपलब्ध करुन दिली आहेत. या आपल्या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, ताबडा, आफ्रो, आशियायी देशातील काळा, गोरा, पिवळा येतात. आपल्या देशातील अस्पृष्य, आदिवासी, शोषित पीडित येतात" [२]

बाबुराव बागुल यांची 'दलित' या संज्ञे संदर्भातील भूमिका खूप व्यापक आहे. वर्णव्यवस्था व वर्गव्यवस्था यांना झुगारुन विज्ञाननिष्ठ युगाचे स्वागत आणि 'माणुस' या मूल्याला महत्त्व देणारी त्यांची व्याख्या व्यापक आहे.

**डॉ. यशवंत मनोहर म्हणतात:**

"शौषितांची जात शोषित. शोषणाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इत्यादी सर्व प्रकारांनी गिळोखलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे दलित होत." [३]

या व्याख्येत सर्व प्रकारच्या शोषणावर डॉ. यशवंत मनोहर यांनी भाष्य केले आहे. आदिवासींचाही यात समावेश होतो.

"दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे रेटला गेलेला वर्ग आहे" [४]..२..

लक्ष्मणशास्त्री जोशी यांची ही व्याख्या आदिवासींचाही समावेश दलित साहित्यात होतो. या त्याची साक्ष देते.

वरील व्याख्येत व्यापकत्व आहे. आदिवासींनाही या समाजव्यवस्थेने नाकारलेले आहे. माणूस म्हणून त्यांचा स्वीकार केला नाही. 'माणूस' असूनही मानवेतर प्राण्याप्रमाणे आदिवासींकडे प्रस्थापितांनी पाहिले. आदिवासी शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यांसमोर प्रस्थापितांच्या शोषणप्रवण व्यवस्थेने नागवलेला जनटी समूह डोळ्यासमोर उभा राहतो. आदिवासींकडे बघण्याची आजही प्रस्थापितांची दृष्टी निकोप नाही. थोर प्रतिभाशाली आदिवासी कवी व विचारवंत भुजंग मेश्राम लिहितात-



सर्वहारा समजाला समानार्थी म्हणून वापरल्या जाणाऱ्या दलित जीवनाचा एक भाग आदिवासी समाजाचा आहे. परंतु आदिवासी सामाजिक जीवनातील सांस्कृतिक वैशिष्ट्याचे पदर वेगळे आहेत. दलित साहित्य जर मानव मुक्तीचे साहित्य असेल तर आदिवासी साहित्य हा मुक्ती लढा पुढे निर्णायक व व्यापक अवस्थेपर्यंत पोहोचवणारी आशादायक उठावणी आहे. तळागाळातल्या सर्व जाती जमातींच्या वेदनांना शब्दबध्द करण्याची प्रतिज्ञा दलित साहित्यिकांनी आपल्या पहिल्याच फेरीत घोषित केली असली तरी अजूनही ... आदिवासी जीवनाचे चित्रण दलित साहित्यात उमटले नाही. कारण आदिवासींच्या सामाजिक जीवनाचे अंतर्विरोधी संदर्भ आहेत. दलित आदिवासी साहित्याचे अंतीम उद्दिष्ट एक असले तरी दलित साहित्याचा प्रदेश व्यापक करण्याच्या दृष्टीने आदिवासी साहित्याचा प्रारंभ आवश्यक ठरतो." [५]

तेंव्हा दलित साहित्यिकांच्या मर्यादांचे भान भुजंग मेश्राम यांना आहे. समताप्रधान संस्कृतीची भूमिका ही दलित व आदिवासी साहित्याची असली तरी आदिवासींचे सांस्कृतिक संदर्भ वेगळे आहेत. उद्देश एक जरी असला तरी आदिवासी साहित्य प्रवाह हा वेगळा ठरतो. आदिवासी साहित्याचा प्रवाह हा दलित साहित्याची कक्षा रुंदावणारा असेल असेही मेश्रामांना वाटते. नव्या साहित्य प्रवाहा विषयी डॉ. भालचंद्र फडके यांनी जे विचार मांडले आहेत ते फार मोलाचे आहेत ते म्हणतात-

"कोणत्याही भाषेतील जिवंत साहित्यात नित्यनवे प्रवाह उदयाला येत असतात. नवे प्रवाह साहित्य समृध्द करीत असतात आणि साहित्यातले 'चैतन्य' टिकवीत असतात. नवे प्रवाह निर्माण झाले नाहीत किंवा नव्या जाणिवेतून लेखन करणारा लेखक वर्ग उदयास आला नाही तर ते साहित्य निःसत्व, दुबळे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नव्या नव्या जाणिवेतून जे लेखन झाले त्यामुळेच तर मराठी साहित्य समृध्द होत चालले आहे, असे आपल्याला वाटते." [६]

डॉ. भालचंद्र फडके यांचे वरील प्रतिपादन अर्थपुर्ण आहे. १९८० नंतर आदिवासी साहित्यप्रवाह समृध्द आशय जाणीव व्यक्त करुन आपले अस्तित्व व अस्मिता सिध्द करीत आहे. यातूनच स्वतंत्र विचारपीठ व साहित्य संमेलनाला प्रारंभ झालेला दिसतो. असे असले तरीही आदिवासी प्रतिभा त्यापुर्वी दलित विचारपिठांवर आपली अस्मिता व आपले अस्तित्व दाखवित होतीच. क्रांतीसाठी परिवर्तनाच्या लढ्यात सामील होण्यासाठी दलित साहित्यपीठाची भूमिका आदिवासींच्या दृष्टीने पोषक होतीच. आपले विचार प्रकट करण्याची संधीही त्यांना दलित साहित्याच्या विचारपीठावर मिळालेली आहे. त्याबद्दल अनेकानी साहित्याचे ऋणही व्यक्त केले आहे. आदिवासी कवी व विचारवंत भुजंग मेश्राम या संदर्भात कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात-

"दलित लेखकांना काही आत्मगत मर्यादा होत्या. जशा आदिवासी ...

या लेखकांना दलित साहित्याने व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली ।. दलित आदिवासी साहित्य समदुःखी साहित्य असल्याने त्यात सुसंवाद घडवून आणला पाहिजे."[७]

आदिवासी साहित्याचे स्वतंत्र अस्तित्वही मेश्रामांनी मान्य केले आहे. दलित व आदिवासी हे साहित्यप्रवाह परिवर्तनवादी असल्यामुळे समन्वयवादी भूमिका त्यांनी स्वीकारली आहे.

**शवंत मनोहर लिहितात-**

"आपल्या साहित्यावर फार मोठी जबाबदारी या परिस्थितीने टाकलेली आहे. ही प्रेरणा बंडाची क्रांतीची आहे. अन्यायाविरुध्द निर्वाणीचे संगर उभारणारी ही प्रेरणा आहे. या प्रेरणेने हजारो वर्षे असलेल्या प्रतिभांना आणि प्रज्ञांना बंधमुक्त केले आहे. साहित्य सौंदर्याची अनोखी शिल्पे या नी मराठी साहित्यात खोदली आहेत. या प्रतिभा जीवन सौंदर्याच्या उपासक आहेत. त्यामुळेच साहित्य सौंदर्याची उपासना ही अनोखी ठरत आहे. आपल्या साहित्याने दुनियेच्या कानाकोपऱ्यात करी प्रेरणेचे झेंडे लावलेले आहेत. मागच्या केवळ पाच पंचवीस वर्षामध्ये घडलेली ही गोष्ट आहे. दुःख ज्या पध्दतीने आपल्या साहित्यातून बोलले तसे दुनियेच्या अन्य कोणत्याही साहित्यातून नसेल. याचे कारण आपली सोबत करणारी प्रेरणा होय. याच प्रेरणेने लक्ष्मण माने, भुजंग मेश्राम, । गायकवाड, वाहरु सोनवणे यांनी प्रतिभांचे निखारे फुलवले. आपली प्रेरणा जातीची नव्हे ती वेची आहे. क्रांती जाणिवेची."[८]

आदिवासी साहित्यामधून व कवितांमधून ही क्रांतीजाणीव क्षणोक्षणी व्यक्त झालेली आहे. जाणिवेच्या कक्षा किती रुंद होत आहेत, या संदर्भातील वरील विवेचन अर्थपूर्ण आहे. आदिवासी ा विचारवंत राजाभाऊ राजगडकर यांना दलित साहित्य समृध्द करण्यासाठी आदिवासी साहित्य यक वाटते. फुले- आंबेडकरी प्रेरणेने ते लिहित आहेत. असा निर्वाळाही ते देतात.

ग.बा. सरदार यांना दलित व आदिवासी साहित्य यांचे वेगळेपण मान्य असूनही या दोन्ही य प्रवाहातील प्रतिभांना आवाहन करताना व्यापक दृष्टीकोन कसा ठेवला पाहिजे. याविषयीचे चिंतन महत्वाचे आहे.

**र लिहितात-**

"कोणतीही व्यक्ती समाजापासून वेगळी असू शकत नाही. त्यामुळे त्या त्या समाजाचे आक्रंदन त्याचा केंद्रबिंदू हा 'माणूस' आहे. त्याचा विसर जाणत्यांनी पडू देता कामा नये. चित्राचा तपशील त्या नसून त्याचा आशय महत्वाचा आहे. विश्व ही वेगवेगळी असतात. आदिवासींचे विश्व वेगळे. चे विश्व वेगळे असते.... झोपडपट्टीवासियांचे विश्व वेगळे असते. ही सगळी विश्वे एक साहित्यिक शकत नाही.... तरीसुध्दा त्यातली 'मनुष्यत्वांची दुःखेही तो समजू शकतो. तं यांनी आपल्या यातून मांडायला हवीत. अन्यायाबद्दल चीड दिसायला हवी... मानवमुक्तीचा संदेश दिला गेला



नाही."[९]

**सारांश :-**

आदिवासी व दलितांचे विश्व वेगळे असले तरी दोन्ही साहित्यप्रवाहांनी व्यापक दृष्टीकोन ठेवायला हवा. मानवमुक्तीसाठी, शोषणाविरुध्द या प्रवाहांचा जन्म झाला आहे. वर्णविरही व जातविरहीत समाज निर्माण करणे हे दोन्ही प्रवाहाचे ध्येय आहे. वर्ण-जात-वर्ग यांचा संत व्हावा. माणसाची ओळख माणूस म्हणूनच व्हायला हवी. असे माणसालाच निर्माण करणारे साहित्य विज्ञानिष्ठ आहे. लोकशाही संस्कृतीवर निष्ठा असणारे हे साहित्य आहे. अशाप्रमारे दलित आदिवासी साहित्याने मुल्यात्मक जाणिवा व्यक्त करुन समताप्रधान संस्कृतीचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

## संदर्भ सूची

१) गायकवाड बाबुराव : दलितेतर लेखक आणि दलित जीवन आधिका प्रकाशन, पुणे, प्र. आ. १५ ऑगस्ट १९९४, पृ. ०९
२) फडके भालचंद्र : दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन पुणे- ३०, प्र.आ. डिसेंबर १९७७, पृ. २७
३) गायकवाड बाबुराव :दलितेतर लेखक आणि दलित जीवन, उनि पृ. १०
४) तत्रैव- पृ.१०
५) मेश्राम भुजंग : आदिवासी साहित्याच्या भूमिकेची मीमांसा, आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक, नाशिक, समाज अभियान पाक्षीक ठाणें, संपा. सीताराम गायकवाड, पृ. १, २
६) फडके भालचंद्र : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, उनि. पृ. ९
७) मेश्राम भुजंग, अध्यक्षीय भाषण, ६ वे आदिवासी साहित्य संमेलन, यवतमाळ, २७, २८ फेब्रु. १९९३, पृ. ०७
८) मनोहर यशवंत : समाज आणि साहित्य समीक्षा, सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ. १९९२ पृ. २५
९) सरदार गं.बा. मुलाखत, शब्दांकन, सुधीर जोग, हाकारा त्रैमासिक, जुलै-सप्टें. १९८३, पृ.